MHMM150013242019

दाखल तारीख:- ३१/०३/२००९
नोंदणी तारीख:- ३१/०३/२००९
निकाल तारीख:- ११/०८/२०२६
कालावधी १७ वर्ष ०४ महिने ११ दिवस

**(फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण क्र. ६ मधील परिच्छेद ४४ (१) )**

**न्यायनिर्णय**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग ६२ वे न्यायालय, दादर, मुंबई यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारीः निलेश नि. धेंड)**

**(आज दिनांक ११ ऑगस्ट २०२६ रोजी खुल्या न्यायदालनात घोषित)**

**नियमीत फौजदारी खटला क्र. ६२००४७२/२०१९ (२९३/पीडबल्यु/२००९)**
सी.एन.आर. क्रमांक. एम एच एम एम १५००१३२४२०१९

पहिली खबर/गुन्हा क्र. २७३/२००८,
पोलीस ठाणेः वरळी, मुंबई.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | | **महाराष्ट्र शासन**,<br>(मार्फत पोलीस ठाणे, वरळी, मुंबई) |
| अधिवक्ता | | विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री एनकफले |
| आरोपी | | **१. मोहम्मद रफिक नासीर शेख**<br>**२. हमीदा उर्फ फातिमा नासीर शेख**<br>**३. शबाना नासीर शेख**<br>**४. फरजाना नासीर शेख**<br>**५. इरफाना नासीर शेख**<br>**६. जावेद नासीर शेख**<br>**७. सना जावेद शेख**<br>**आ क्र १ ते ७ राहणार – सी/१६०, सययदवाडी, ठाकूरव्दार रोड, व्ही पी रोड, मुंबई** |
| अधिवक्ता | | विद्वान अधिवक्ता श्री बनसोडे आरोपींकरीता. |

**भाग 'ब'**

**(फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण क्र. ६ मधील परिच्छेद ४४ (१) )**

| | |
|---|---|
| अपराधाची तारीख | २९/०६/२००८ |
| गुन्हा नोंदवल्याची तारीख | ०८/०८/२००८ |

| | |
|---|---|
| अंतिम अहवालाची तारीख | ३१/०३/२००९ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | ०७/०७/२०१४ |
| पुरावा नोंदवण्यास सुरुवात झाल्याची तारीख | २३/०१/२०२३ |
| प्रकरण न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवल्याची तारीख | २१/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ११/०८/२०२६ |

**आरोपींची माहिती**

| आरोपीचा क्रम | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर मुक्त केल्याची तारीख | ज्या बद्दल तक्रार दिली अथवा शाबीत झालेला अपराध | निर्दोष मुक्त केले / शिक्षा | झालेली शिक्षा | कलम ४२८ फौ. प्र. सं. नुसार पुर्वी भोगलेल्या कारावास कमी केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **मोहम्मद रफिक नासीर शेख** | अटकपूर्व जामीन | | भारतीय दंड संहिताचे कलम ४९८(अ), ४०६ सह ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले | | |
| २ | **हमीदा उर्फ फातिमा नासीर शेख** | ...”..... | | ...”..... | ...”..... | ...”..... | ...”..... |
| ३ | **शबाना नासीर शेख** | ...”..... | | ...”..... | ...”..... | ...”..... | ...”..... |
| ४ | **फरजाना नासीर शेख** | ...”..... | | ...”..... | ...”..... | ...”..... | ...”..... |
| ५ | **इरफाना नासीर** | ...”..... | | ...”..... | ...”..... | ...”..... | ...”.... . |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **शेख** | | | | | | |
| ६ | **जावेद नासीर शेख** | ..."..... | | ..."..... | ..."..... | ..."..... | ..."..... |
| ७ | **सना जावेद शेख** | ..."..... | | ..."..... | ..."..... | ..."..... | ..."..... |

**भाग 'क'**

**अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची सूची**

**अ. अभियोगपक्षः**

| अनु.क्र. | नाव | पुरावा (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अभियोगपक्ष साक्षीदार क्र. १ | निलोफर नजरुददीन शेख | वर्दीदार (नि. ७२ लगत)<br>फिर्याद (नि. ७३ लगत) |
| अभियोगपक्ष साक्षीदार क्र. २ | कौसर सलीम इब्राहिम | साक्षीदार (नि. ७८ लगत) |

**ब. बचावपक्षाचे साक्षीदार, असल्यासः**

| अनु.क्र. | नाव | पुरावा (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| | - | |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यासः**

| अनु.क्र. | नाव | पुरावा (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| | - | |

१. आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिताचे कलम ४९८(अ) आणि ४०६ सह ३४ अन्वये आरोप ठेवुन खटला चालविण्यात आला.

२. अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात असे आहे की,

मार्च २००७ ते २९/०६/२००८ या कालावधीत सी-१६०, सययद वाडी, ठाकूरव्दार, वी. पी रोड, मुंबई आरोपींनी वर्दीदार हिचे पती व त्याचे नातेवाईक या नात्याने वर्दीदार यांचा

वारंवार शारीरीक व मानसिक त्रास देवून छळ केला तसेच वर्दीदार हिचे स्त्रीधनाचा अपहार केला. वर्दीदाराने सदर घटनेविषयी पोलीसात वर्दी दिली.

३. सदर वर्दीवरुन पोलीस उप निरिक्षक वरळी यांनी गुन्हा नोंद क्रमांक २७३/२००८ दाखल केला. वर्दीदाराच्या सांगण्याप्रमाणे तक्रार नोंदविली. साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपासांती न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. सदर दोषारोपपत्रावरुन गुन्हयाची दखल घेतल्यानंतर आरोपींविरुध्द न्यायालयाने आरोप निश्चित केले. आरोपींनी सदर आरोप नाकारल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४२ च्या तरतुदीअन्वये खटल्याची सुनावणी सुरु झाली.

५. सदर वादातीत कथन सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाने वर नमूद साक्षीदारांची साक्ष नोंदवली. दिनांक ०९/०६/२०२६ रोजीच्या निशाणी १ वरील आदेशाप्रमाणे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

६. उपलब्ध गुन्हादर्शक पुरावा आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदवते वेळी सांगण्यात आला, त्यांचा बचाव संपुर्ण नकाराचा आहे.

७. प्रस्तुत प्रकरणाच्या निर्णयाप्रत पोहोचण्याकरीता खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे;

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, मार्च २००७ ते २९/०६/२००८ या कालावधीत सी–१६०, सययदवाडी, ठाकूरव्दार, वी.पी.रोड, मुंबई आरोपींनी आपापसात संगनमत करुन वर्दीदार हिस क्रूर वागणुक दिली आणि त्याव्दारे भारतीय दंड संहिताचे कलम ४९८ (अ) सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला ? | नाही |
| २) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपापसात संगनमत करुन त्यांच्याकडे दागिने मालमत्तेची हुकुमत विश्वासाने सोपविण्यात आली आणि ती मालमत्ता स्वतःच्या उपयोगासाठी वापरली, त्या मालमत्तेचा न्यासभंग केला आणि त्याव्दारे तुम्ही भारतीय दंड संहिताचे कलम ४०६ सह ३४ अन्वये शिक्षापात्र केला ? | नाही |

## <u>निष्कर्षाबाबतची कारणे</u>

### <u>मुद्दा क्र. १ व २ बाबत</u>

८. दोन्ही पक्षकारांच्या युक्तिवादाच्या पार्श्वभूमीवर अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे विवेचन करण्यापुर्वी याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, फौजदारी खटल्यांमध्ये आरोपीवर लावलेले आरोप शाबीतीची सर्वस्वी जबाबदारी ही केवळ अभियोग पक्षावरच असते. ते आरोप कशा पध्दतीने सिध्द करायला हवेत याकरिता 'शाबीत' या संज्ञेची व्याख्या विचारात घेणे महत्वाचे ठरेल. **भारतीय साक्षीपुरावा अधिनियम १८७२ च्या कलम ३** मध्ये '**शाबीत**' या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे, त्यानुसार *जेव्हा आपणापुढील बाबींचा विचार केल्यानंतर, एखादे तथ्य अस्तित्वात आहे असा न्यायालयाचा विश्वास होतो किंवा व्यवहारदृष्टी असलेल्या माणसाने ते अस्तित्वात आहे अशा समजुतीने त्या विशिष्ट प्रकरणाच्या परिस्थितीत वागायला हवे तितके त्याचे अस्तित्व न्यायालयाला संभवनीय वाटते तेव्हा ते तथ्य सिध्द झाले असे म्हटले जाते.*

९. वर नमुद व्याख्या पाहता ती दोन भागात विभागल्याचे दिसुन येते, त्याच्या पहिल्या भागानुसार तथ्याच्या अस्तित्वाचा विश्वास न्यायालयाला वाटणे गरजेचे आहे. फौजदारी खटल्यांमध्ये आरोप हे रास्त शंकेपलिकडे जावुन सिध्द करावयाचे असल्याने सदर व्याख्येचा पहिला भाग या ठिकाणी लागु पडतो. यासर्व बाबी विचारात घेवुन या प्रकरणात अभियोग पक्ष हे आरोप सिध्द करण्यात कितपत यशस्वी ठरला हे पाहणे याठिकाणी महत्वाचे आहे.

**१०.** आरोपींवर लावण्यात आलेले आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने वर्दीदार निलोफर नजरुददीन शेख (अ. सा. क्र १ /नि. ७२) यांची साक्ष नोंदविली. सदर

साक्षीदाराने आपल्या साक्षीत असे सांगितले आहे की, आरोपी मो. रफिक नझीर शेख हा पती असुन इतर आरोपी हे त्याचे नातेवाईक आहेत. वर्दीदाराचे आरोपी क्र. १ सोबत लग्न १३/१२/२००६ रोजी कुर्ला येथील स्वामी विवेकानंद हॉल मध्ये झाले. लग्नात तिच्या आईने तिला दोन तोळयाचा हार, एक तोळयाचे कानातले व एक तोळयाची चेन, एक तोळयाची अंगठी, टायटनचे घडयाळ पतीला दिले होते तसेच घरातील सर्व उपयोगी वस्तू बेड, टीव्ही व इतर भांडीकुंडी दिले होते. लग्नानंतर एक महिना सर्व काही ठिक होते. दिवसभर ती सययदवाडी, ठाकूरवाड येथे राहायची व संध्याकाळी वरळी येथील घरी जायची. सययदवाडी येथे तिच्या सास–याचे घर होते. तिथे जागा नसल्यामुळे वरळीला रात्री राहण्यासाठी खोली घेतली होती. सययदवाडी येथे राहत असताना तिच्याकडुन कामामध्ये काही कमी जास्त झाले तर तीच्या आईला फोन करुन सांगत असे की तिला माहेरी परत घेवून जा. आरोपी क्र १ चा एक भाउ मानसिक रुग्ण होता. आरोपी क्र १ तिला म्हणायचा की त्याला धक्का देवून त्याच्या भावाला तिने ढकलले असे सांगेन. एकदा तिच्या पतीने तिच्या अंगावर रॉकेल ओतले होते. वरळी येथे राहत असताना तो तिला दहा रुपये देवून यात सर्व काही कर असे सांगायचा. दिवसभर उपाशी ठेवायचा. आरोपी क्र १ हा तिला नेहमी व्यवसाय करण्यासाठी माहेराहून पैसे घेवून ये असे सांगायचा. तसेच तो वर्दीदाराला ती बियर बार मध्ये काम करते, तुझी आई देखील बार मध्ये काम करते असे बोलायचा, त्रयस्थ व्यक्तीबरोबर वर्दीदाराचे प्रेम संबध आहेत असे बोलायचा. हुंडयामध्ये रोख रक्क्म दिली नाही म्हणून वर्दीदाराला त्रास दयायचे, एक लाख रुपये घेवून ये असे म्हणायचे. तिच्या पतीला स्वतःचा व्यवसाय करावयाचा होता म्हणून तो सतत वर्दीदाराला पैसे आणण्यासाठी सांगत होता. वर्दीदार गरोदर असताना तिला पैशाच्या मागणीवरुन घरातून

हाकलून दिले होते. वर्दीदाराने मुलाला जन्म दिल्यानंतर देखील आरोपींच्या वागण्यात बदल झाला नाही. आरोपींनी वर्दीदाराला घराबाहेर काढले.

**११.** वर्दीदाराला साक्षीला दुजोरा देण्यासाठी वर्दीदाराचे वडिल कौसर सलीम इब्राहिम (अ. सा. क्र २ /नि. ७८) यांची साक्ष नोंदविली. त्यांनी वर्दीदाराच्या साक्षीला सुसंगत अशी साक्ष दिली आहे. आरोपी क्र १ सोबत वर्दीदाराचा लग्न झाले होते, वर्दीदाराला लग्नात दागदागिने, घरातील सर्व साहित्य, फर्निचर दिले होते. लग्नानंतर आरोपी क्र १ हा वर्दीदाराचा मानसिक, शारीरीक छळ करायचा. त्याने तिच्यावर रॉकेल ओतले होते. त्याला इलेक्ट्रानिक वस्तुचा व्यवसाय करावयाचा होता म्हणून तिला माहेराहून पैसे आणण्यास सांगायचा. आरोपी क्र १ ने वर्दीदाराला पोस्टाने तलाक पत्र पाठविले होते.

**१२.** सदर प्रकरणात वर्दीदार यांची साक्ष केवळ महत्वाची असुन साक्षीदार क्र २ मिळालेल्या माहितीअनुसार साक्ष देत आहेत म्हणजेच त्यांचा पुरावा ऐकिव पुराव्यामध्ये मोडतो. त्याचबरोबर सरतपासाची पाहणी केली असता असे दिसुन येते की, आरोपी क्र २ ते ७ विरुध्द वर्दीदाराने काहीही सांगितलेले नाही. त्याच बरोबर आरोपी क्र १ ने वर्दीदाराच्या अंगावर रॉकेल टाकले आणि त्यासाठी तिला पोददार रुबग्णालयात पाठविले असे कथन केले असले तरी त्याबाबतचे वैदयकिय प्रमाणपत्र किंवा त्यावेळचा पोलिस रिपोर्ट दाखल करण्यात आलेला नाही. हुंडा मागितल्याचे कथन वर्दीदाराने केले आहे व तिच्या पुराव्यातुन असे दिसुन येते की, तिच्या पतीने इलेक्ट्रानिक वस्तू विक्री करण्याचे दुकान टाकण्यासाठी पैशाची मागणी केली परंतु सदर मागणी कधी करण्यात आली होती, कोठे करण्यात आली होती याबाबत पुराव्यात दिसुन येत नाही. उलटतपास पाहता असे दिसुन येते की, आरोपीने आरोपी क्र १ व वर्दीदार यांच्यामध्ये इतर आरोपीबरोबर तडजोडीचा करारनामा झाला होता. सदर करारनामा नोटरी पब्लीक समोर शमथेवर करण्यात आल्याचे दिसुन येते. त्याचबरोबर हमीपत्र वर्दीदाराने आरोपींच्या बरोबर केले असुन त्याप्रमाणे नीट वागण्याची व दागिने स्वतः नेल्याची कबुली दिली आहे. वर्दीदार यांच्या पुराव्यातुन असे दिसुन येते की, तिने आरोपींनी बळजबरीने तिची कागदावर सही घेतल्याचे कथन केले असले तरीही अभिलेखावर दाखल,

बचावातील कागदपत्र यांचे अवलोकन केले असता सदर कागदपत्रे नोटरी पब्लीक यांच्या समक्ष प्रतिज्ञेवर करण्यात आल्याचे दिसुन येते.

**१३.** वर्दीदार यांच्या पुराव्यातुन असे दिसुन आले की, तिने स्वतः आरोपी क्र १ च्या घरी जावुन बळजबरीने त्याच्या घराचे कुलुप तोडले व साहित्य नेण्याचा प्रयत्न केला. सदर साक्ष अर्धी असुन तिच्या चीजवस्तू नेण्यात तिला यश आले किंवा नाही याबाबत कथन केलेले नाही. परंतु वर नमुद प्रतिज्ञापत्रामध्ये तिने कबुल केलेले आहे की, ती स्वतः तिच्या चीजवस्तु घेवून गेली आहे.

**१४.** आरोपींनी हुंडा मागितला व त्याचे कारण दोन्ही साक्षीदारांनी आपल्या पुराव्यात कथन केले असले तरी आरोपी क्र १ जो वर्दीदाराचा पती आहे, त्याची सदर व्यवसाय करण्याची क्षमता असल्याबाबत कोठेही कथन केलेले नाही. अशा परिस्थीतीत अभिलेखावरअसणारी कागदपत्रे जी आरोपींनी त्यांच्या बचावामध्ये फौजदारी व्यवहार संहिता कलम ३१३ अन्वयेच्या जबाबामध्ये दाखल केली आहेत त्या अनुषंगाने असे दिसुन येते की, आरोपींना सदर प्रकरणामध्ये गोवण्यात आले आहे. त्याच बरोबर अभिलेखावर असा कोणताही पुरावा आलेला नाही की, आरोपींनी वर्दीदारास पैशाची मागणी करुन त्याच्या पुर्ततेकरिता मानसिक व शारीरीक त्रास दिला जेणेकरुन फिर्यादी स्वतःच्या जीवाचे काही बरे वाईट करुन घेईल किंवा स्वतःचा जीव तिला दयावासा वाटतो असे कृत्य अभिलेखावर आलेले दिसुन येत नाही.

**१५**. त्याचप्रमाणे दोन्ही साक्षीदाराचा आरोपीच्या वकिलांनी घेतलेल्या उलटतपासात वर्दीदाराने दिलेली फिर्याद व त्यातील तफावती तसेच साक्षीदाराचा पोलिसांनी नोंदविलेला जबाब व त्यातील तफावती आणलेल्या आहेत. या व्यतिरिक्त उर्वरित उलटतपास हा नकारात्मक स्वरुपाचा आहे.

**१६.** प्रस्तूत प्रकरणात आरोपींविरुध्द भा.द.वि. कलम ४९८–अ, ४०६ अन्वये दोषारोप निश्चीत केलेले आहेत. या ठिकाणी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या ***'पन्नालाल कोठारी ..वि..महाराष्ट्र शासन, २००७, ऑल एम. आर. १३४९' तसेच 'सिताबाई वांजे..वि..महाराष्ट्र शासन, २००८ ऑल एम.आर. (कि.), ८८३'*** या प्रकरणातील न्यायनिर्णयाचे अवलोकन करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी कोणत्याही प्रकारची छळवणुक ही क्रुरते अतंगत येवू शकत नाही तसेच, भारतीय दंड विधान कलम

४९८–अ अंतर्गत क्रुर कृत्य (Cruelty) हे दैनंदिन वैवाहीक जिवनामध्ये असणा–या तफावतीपासून वेगळे असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या ***'काशिनाथ सुडके वि. महाराष्ट्र शासन, २००५ क्रि. लॉ. ज. ४९९४'*** या प्रकरणातील न्यायनिर्णयाचे अवलोकन करणे आवश्यक आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी नातेवाईकांचा ऐकीव पुरावा आरोपींनी फिर्यादीस दिलेली क्रुरतेची वागणुक शंकेपलीकडे सिध्द करण्यासाठी पुरेसा नसल्याचे नमुद केलेले आहे. तसेच मा. उच्च न्यायालय, केरळ यांच्याकडील '***लॉरेन्स वि. स्टेट ऑफ केरळ, २००२, क्रि. लॉ. ज., ३४५८'*** या प्रकरणातील न्यायनिर्णयाचे अवलोकन करणे आवश्यक आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये मा. उच्च न्यायलय यांनी पत्नीने आरोपींनी तिच्याकडे जास्त हुंडा मागितल्याबाबतच्या बाबीस पुराव्याचा दुजोरा मिळत नसल्यास तसेच तिला केलेल्या मारहाणीबाबत वैदयकीय पुरावा दाखल नसल्यास आरोपींनी तिचा क्रुरपणे छळ केल्याचे शाबीत होत नाही असे नमुद केलेले आहे. तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई, यांच्या ***'अब्दुल मजीद अन्सारी वि. महाराष्ट्र शासन, २००७ ऑल एम. आर. (क्रि), ४३ '*** या प्रकरणातील न्यायनिर्णयाचे अवलोकन करणे आवश्यक आहे. प्रस्तृत न्यायनिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय यांनी पैसे मागितल्याची बाब अथवा आरोपींनी फिर्यादीचा छळ अथवा अयोग्य वागणुक दिल्याची बाब अभियोग पक्षामार्फत शाबीत केली नसल्यास केवळ आरोपींच्या पुराव्यातील कमजोरीमुळे अभियोग पक्ष यश मिळवू शकत नाही आणि अभियोग पक्षास त्यांची केस स्वतःहुन शाबीत करावी लागते असे मत व्यक्त करुन आरोपी हे मुक्ततेसाठी पात्र ठरतात हे नमुद केलेले आहे.

**१७.** भा.द. वि. कलम ४९८–अ चे अवलोकन करीता त्यामध्ये आरोपींनी फिर्यादीस क्रुरपणे वागणुक देवून ज्यामुळे फिर्यादी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होईल अथवा ती स्वतःला दुखापत अथवा तिच्या जिवीताला, अंगाला अथवा स्वास्थाला धोका निर्माण होईल या प्रकारची कृती करणे असे नमुद केलेले आहे. तथापि, प्रस्तृत प्रकरणातील साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन करीता आरोपींनी फिर्यादीकडे बेकायदेशिर मागणी करुन फिर्यादीने स्वतःच्या जिवीताला धोका उत्पन्न होईल असे कृत्य केले या स्वरुपाचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

**१८.** भारतीय दंड विधान कलम ४९८–अ मध्ये नमुद 'क्रुरता (Cruelty)' या बाबींच्या

सिध्दते करीता आवश्यक असणारे नमुद तत्वाचा विचार करीता ते उच्च पातळीची (Degree of Proof is on higher footing) आहेत. केवळ फिर्यादीने पुराव्यादरम्यान आरोपींनी तिचा पैशाच्या मागणीकरीता छळ करुन तिचा मानसिक व शारीरीक त्रास दिला असे सांगितल्याने, क्रुरपणा (Cruelty) शाबीत झाला असे ग्राह्य धरता येणार नाही. तर त्या बाबीमध्ये आरोपींनी कोणत्या व कशा प्रकारे तिची छळवणुक केली, जेणे करुन ती आत्महत्या करण्यास अथवा स्वतःला दुखापत अथवा तिच्या स्वास्थाला धोका उत्पन्न होईल असे काही कृत्य फिर्यादीने केले काय ? आणि त्याबाबतचा पुरावा अभिलेखावर येणे अत्यंत आवश्यक व क्रमप्राप्त आहे. सबब वर नमुद प्रकरणातील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता, भारतीय दंड विधान कलम ४९८–अ सिध्द होण्याकरीता, घटकांनी पुर्तता झालेली दिसून येत नाही.

**१९.** वर्दीदाराचे कथन की, तिच्या वडिलांनी तिच्या लग्नात दिलेल्या स्त्रीधनाचा तसेच घरातील उपयोगी वस्तूचा आरोपींनी अपहार केला. ही बाब सिध्द करण्यासाठी वर्दीदार किंवा तिचे वडिल यांनी केवळ तोंडी पुरावा वगळता कोणताही कागदोपत्री, स्वतंत्र साक्षीदार जसे की त्यांच्या लग्नामध्ये हजर नातेवाईक ज्यांच्यासमक्ष सदर दागिने व घरोपयोगी वस्तू आरोपींना दिल्या होत्या. त्याचबरोबर प्रतिज्ञापत्राअनुसार वर्दीदाराने सर्व चीज वस्तू घेवून गेल्याचे कबुल केलेले आहे, त्यामुळे भा.द.वि कलम ४०६ अन्वयेचा गुन्हा शाबित करण्यासाठी अभियोग पक्षाने दिलेला पुरावा हा अपुरा आहे.

**२०.** एकंदरीत, याकामी मुख्य पुराव्याचा अभाव असल्यामुळे उपलब्ध परिस्थितीजन्य पुरावा पाहता आरोपींवर लावण्यात आलेल्या आरोपांचे तात्वीक अंग रास्त शंकेपलिकडे जावुन सिध्द करण्यासाठी उपलब्ध पुरावा अपुरा वाटतो. त्यामुळे विचाराधीन मुद्दयांचा निष्कर्ष नकारार्थी देवुन खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

(१) आरोपींना भारतीय दंड संहिताचे कलम ४९८(अ), ४०६ सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराधातून फौजदारी प्रक्रियाचे कलम २४८(१) अन्वये निर्दोषमुक्त करुन तात्काळ सोडुन देण्यात येते.

(२) आरोपींचे पुर्वीचे बंधपत्र व जामीनकदबे रद्द करण्यात येतात.

(३) आरोपींनी रु.७,०००/- (रु. सात हजार) चे प्रत्येकी वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७अ अन्वये दयावेत.

NILESH NITIN DHEND
Digitally signed by NILESH NITIN DHEND
Date: 2026.08.11 16:53:21 +0545

(निलेश नि. धेंड)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
६२वे न्यायालय, दादर, मुंबई.

दिनांकः ११/०८/२०२६
ठिकाणः मुंबई

NILESH NITIN DHEND
Digitally signed by NILESH NITIN DHEND
Date: 2026.08.11 16:53:25 +0545

(निलेश नि. धेंड)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
६२वे न्यायालय, दादर, मुंबई.

Dictated on : ११/०८/२०२६
Transcribed on : ११/०८/२०२६
checked on : ११/०८/२०२६
Signed on : ११/०८/२०२६